**MHNS280013682023**

**विशेष दिवाणी दावा क्रमांक १०७/२०२३ मधील निशाणी क्र.४९ वरील आदेश.**

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी सदरहु दाव्यात मयत मुळ वादी लक्ष्मण दामोधर सटवे यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवुन वारस रेकॉर्डवर घेणेकामी दाखल केलेला आहे. ते असे नमुद करतात की, मुळ वादी लक्ष्मण दामोधर सटवे हे दि.०७/१२/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. मयत मुळ वादी लक्ष्मण मयत झाल्यापासुन ९० दिवसांच्या आत त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते परंतु मुळ वादी लक्ष्मण सटवे यांचा दावा नाशिक येथील दिवाणी न्यायालय, व. स्तर येथे चालु होता. त्यामुळे सदर दाव्याबाबत माहिती घेण्यास व वेळेत वकिलांना भेटण्यास मुळ वादीच्या वारसांना उशीर झालेला आहे. त्यामुळे मुळ वादीचे वारस रेकॉर्डवर घेण्यास अंदाजे ८ महिने (२४० दिवस) उशीर झालेला आहे. त्यामुळे वादीच्या वारसांविरूध्द दावा अबेट झालेला आहे. त्यामुळे वादीचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होवुन व अबेटमेंट सेट असाईड होवुन मिळण्यासाठी वादीने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सदरचा विलंब माफ न झाल्यास वादींच्या वारसांचे अतोनात असे नुकसान होणार आहे व प्रतिवादींचे काहीएक नुकसान होणार नाहीत तसेच दावा स्थावर मिळकतीबाबत असल्याने देखील वादीचे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी मिळणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे असल्यामुळे सदर बाबींचा सहानुभुतीपुर्वक विचार होवुन वादीचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होवुन व अबेटमेंट सेट असाईड होवुन मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र.१० तर्फे सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले असुन वादीच्या अर्जास औपचारीक हरकत घेतलेली आहे. त्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये वादी यांनी दाखल केलेल्या अर्जात वादी यांना किती दिवसांचा उशीर का झालेला

आहे याबाबत काहीएक वर्णन केलेले नाही. तथापि, विलंबाचे कारण समर्पक नाही. याकारणास्तव वादींचा नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**३.** मी दोन्ही पक्षांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता मुळ वादी लक्ष्मण दामोधर सटवे यांचे वारस अभिलेखावर येणे न्यायोचित ठरेल. वादीने सदर वारस अभिलेखावर घेण्यास जाणुनबुजून उशिर केलेला नाही असे कथन केले आहे. सदर कथन व प्रतिवादींचा आक्षेप विचारात घेता माझ्या मते वादीचा प्रस्तुतचा अर्ज खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर मान्य केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट वादीचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास भविष्यामध्ये दाव्यात गुंतागुंत वाढण्याची शक्यता जास्त आहे. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

**१.** प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.४९ मंजुर करण्यात येत आहे.

**२.** मुळ वादी लक्ष्मण दामोधर सटवे यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब हा वादींनी प्रतिवादी यांना खर्च रक्कम रु.३००/— (तिनशे रूपये मात्र) देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो आणि त्यांच्याविरूध्दचा अबेटमेंटचा आदेश रदद करण्यात येतो.

SACHIN HINDURAO KHADE

Digitally signed by SACHIN HINDURAO KHADE
Date: 2026.04.07 16:37:05 +0530

ठिकाण : सिन्नर.
दिनांक :— ०७/०४/२०२६.

(सचिन एच. खाडे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
सिन्नर.

**Certificate**

I affirm that the contents of this PDF file are same, word to word as per the original

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Smt. Bharati D. Uphade, Stenographer (Grade-II) |
| Name of the Court | : | Civil Judge Senior Division, Sinnar. |
| Dictated on | : | 07/04/2026 |
| Typed on | : | 07/04/2026 |
| Checked on | : | 07/04/2026 |
| Signed on | : | 07/04/2026 |
| PDF uploaded on | : | 07/04/2026 |

$\gamma$